# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## अधिसुचना

## ३५ वा दीक्षांत समारंभ

जा.क्र.डॉ.पं.दे.कृ.वि./३५/ दीक्षांत/ /२०२१ दिनांक ०१/०४/२०२१

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचा ३५ वा दीक्षांत समारंभ, शुक्रवार दिनांक ३०-०४-२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता कृषि महाविद्यालय, अकोला येथील दीक्षांत समारंभाचे सभागृहामध्ये होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी दिनांक १/१/२०२० ते २८/०२/२०२१ या कालावधीत विद्यापीठाची आचार्य पदवी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना उपस्थितीत व पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना अनुपस्थितीत या दीक्षांत समारंभात पदवी प्रदान करण्यात येईल. तरी विहीत नमुन्यातील अर्ज विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना पाठविण्यात आलेले आहेत, त्यांनी विद्यापीठाने पाठविलेले सूचनापत्र वाचून त्याप्रमाणे विहीत नमुन्यातील अर्ज दि. २३.०४.२०२१ पर्यंत उपकुलसचिव (वि.वि.), डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे कार्यालयात आवश्यक शुल्कासह भरून पाठविणे आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना विहीत नमुन्यातील अर्ज प्राप्त झाले नसतील, त्यांनी विहीत नमुन्यातील अर्ज उपकुलसचिव (शिक्षण), डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचे कार्यालयातून प्राप्त करून घ्यावेत. तसेच विद्यापीठाची वेबसाईट **http://www.pdkv.ac.in** वर सुध्दा विहीत नमुन्यातील अर्ज व सूचनापत्र उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

आचार्य विद्यार्थ्यांनी दीक्षांत समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्राप्त करावयाची आहे, त्यांनी दिनांक २९/४/२०२१ रोजी सकाळी ९.०० वाजता आचार्य पदवीचे विद्यावस्त्रे संबंधीत कक्ष अधिकाऱ्याकडून घेवून सकाळी १०.०० वाजता होणाऱ्या रंगीत तालीमेस व दिनांक ३०/४/२०२१ ला सकाळी ९.३० वाजता सुरू होणाऱ्या दीक्षांत मिरवणुकीच्या अगोदर व मुख्य समारंभास न चुकता हजर राहावे.

(टिप - पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्र सबंधित महाविद्यालस्तरावर दि. **१५.०५.२०२१** पर्यंत वितरीत करण्यात येतील)

(डॉ. एस.आर. काळबांडे)
कुलसचिव